# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र.१६९/२०१९

**विषय : स्थानिक प्रवासभत्ता व स्वत:चे वाहन वापराच्या दर वाढीबाबत...**
**संदर्भ : परिपत्रक क्र. वित्त/२०१३-१४/२५ दि. ०१/०४/२०१४.**
**परिपत्रक क्र. वित्त/२०१०-११/११८० दि. ०६/०९/२०१०.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवास व दैनिक भत्ता नियम यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

**५) स्थानिक प्रवासभत्ता :**

५.२) विद्यापीठाच्या कामासाठी पुणे येथे येणाऱ्या स्थानिक सदस्यांना एक दिवसासाठी स्थानिक प्रवासभत्ता म्हणून रू.५००/- देय होईल.

**व्याख्या : स्थानिक :**

पुणे महानगरपालिका/पिंपरी चिंचवड महानगरपालिका/पुणे लष्कर/खडकी लष्कर विभाग तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठापासून २५ किलोमीटर परिघ.

**८.७) स्वतःचे वाहन वापरासाठी किलोमीटर भत्ताः**

मालकीच्या अथवा भाडयाच्या वाहनातून प्रवासासाठी किलोमीटर भत्याचे दर खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्णन | दर |
|---|---|---|
| १ | स्वत:चे/भाडयाचे पेट्रोल वाहन दर | रू. १०/- (प्र. कि.मी) |
| २ | स्वत:चे/भाडयाचे डिझेल/सी.एन.जी. वाहन दर | रू. ८/- (प्र. कि.मी) |
| ३ | व्यवस्थापन परिषद सदस्य व विद्याशाखांचे अधिष्ठाता | रू. १३/- (प्र. कि.मी) |

सदर दर दिनांक : ११/०७/२०१९ पासून लागू होईल.

(सीए अतुल पाटणकर)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१९-२०/५१०
दिनांक : ११ जुलै, २०१९

**प्रत :** माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्रशासकीय अधिकारी, सर्व प्रशासकीय विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/संस्था,

) यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे.